### डॉ. पी.ए. इनामदार यांची खंत

# अल्पसंख्याक संस्थांच्या हक्कांकडे दुर्लक्ष

शहर संचार

सोलापूर, दि. २३- अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांचे मूलभूत हक्क भारतीय घटनेने दिले असतानाही मूलभूत हक्कांकडे वरिष्ठ स्तरावरून दुर्लक्ष केले जाते, अशी खंत पुणे येथील महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. पी.ए. इनामदार यांनी व्यक्त केली.

सोलापूर विद्यापीठाच्या बैठकीच्या निमित्ताने डॉ. इनामदार सोलापूर दौऱ्यावर आले होते त्यावेळी वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीस भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ऐ.प.दि. जैन पाठशालाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांनी त्यांचे स्वागत केले. या भेटीत त्यांनी वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, हिराचंद नेमचंद महाविद्यालय, बीबीए आणि एमबीए विभागासही भेट दिली.



वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे डॉ. पी.एन. इनामदार यांचा डॉ. रणजित गांधी यांनी सत्कार केला. यावेळी भूषण शहा, पराग शहा, प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे, ॲड. विजय मराठे व अन्य.

पुढे बोलताना डॉ. इनामदार म्हणाले, अल्पसंख्याक शिक्षण संस्थांना नवनव्या अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे व त्यांचे संपूर्ण व्यवस्थापन करण्याचे अधिकार भारतीय घटनेने दिलेले आहे. त्यामुळे अशा संस्थांच्या कामकाजावर देखरेख ठेवणाऱ्या विद्यापीठांनी घटनेने आखून दिलेल्या मूलभूत हक्कांचा बारकाईने अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. कोणत्याही परिस्थितीत अल्पसंख्याक संस्थांवर अन्याय होणार नाही याबाबत विद्यापीठ दक्ष असणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

यावेळी संस्थेचे खजिनदार भूषण शहा, पराग शहा, प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे, ॲड. विजय मराठे, प्राचार्य डॉ. अजित माणिकशेटे, प्राचार्य डॉ. बी.एन. बारकूल, प्राचार्य डॉ. शिवकुमार गणापूर, डॉ. बाजीराव अहिरे आदी उपस्थित होते.